**संच : क**

# शिक्षकांसाठी सूचना पाचवी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

**इयत्ता - पाचवी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : ४०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्दिष्ट** : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना** :
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द** :

| | |
|---|---|
| १) वादळ | २) पर्वत |
| ३) दिवाळी | ४) पवित्र |
| ५) खुराक | ६) फक्कड |
| ७) वैरण | ८) संगीत |
| ९) पासष्ट | १०) फॉल |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'पर्वत' ऐवजी 'परवत' किंवा 'दिवाळी' ऐवजी 'दीवाळी' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४) हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न २) क)** दुपारी (गुण १)

**प्रश्न ३) ब)** धापा टाकतच मोहन घरात शिरला. (गुण २)
(उताऱ्यातील उत्तर अपेक्षित आहे.)

**प्रश्न ४)** प्रामाणिकपणा व स्वाभिमानी (गुण २)



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

## संच : क

**प्रश्न ५ ते ७) ही कविता वाच आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ५)** हिरव्या पिसांचा (गुण १)

**प्रश्न ६)** **ब)** मातीच्या कणांमधून झाडांना नवीन पालवी फुटणे. (गुण २)

**प्रश्न ७)** पाऊस पडला नाही तर शेतात पीक येणार नाही,
दुष्काळ पडेल, पाणीटंचाई जाणवेल. (गुण २)
(अशा आशयाचे विद्यार्थ्यांच्या भाषेतील उत्तर स्वीकारावे. उत्तराच्या स्वरूपानुसार एक किंवा दोन गुण द्यावेत.)

**प्रश्न ८ ते १०) खालील जाहिरात वाच. त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न ८)** **ब)** बालनाट्य (गुण १)

**प्रश्न ९)** मुलांसाठी. 'धमाल विनोदी बालनाट्य' यावरून कळते. (गुण २)

**प्रश्न १०)** 'तिकिट विक्री नाट्यगृहावर रात्री ८ वाजेपर्यंत' या वाक्यावरून कळते.
नाही. (गुण २)

**प्रश्न ११)** शबानाने कपडे आणले. (गुण १)

**प्रश्न १२)** सखारामकडे शेळ्या होत्या. (गुण १)

**प्रश्न १३)** काल आम्ही बागेत गेलो होतो. (गुण १)

**प्रश्न १४)** योग्य वाक्यास एक गुण. (गुण १)

**प्रश्न १५)** १) भरदार, रसदार, सरदार, धारदार इ. पैकी कोणत्याही एका शब्दास अर्धा गुण. (गुण १)
२) सुंदरता, निपुणता, श्रेष्ठता इ. पैकी कोणत्याही एका शब्दास अर्धा गुण.

**प्रश्न १६)** ''अरे! जरा मला दुकानातून डाळ, तांदूळ आणि साखर आणून दे.'' (गुण १)
(दुहेरी अवतरण चिन्ह व पूर्णविराम दोन्ही दिल्यास एक गुण. दोन्ही पैकी एक दिल्यास अर्धा गुण)

**प्रश्न १७)** १) रमाला शाळेची खूप आवड होती. (गुण २)
२) गावात चौथीपर्यतच शाळा होती.
३) बाबांनी रमाचे शिक्षण अडचणीमुळे बंद केले.
४) मुख्याध्यापकांनी बाबांची समजूत घातली.
५) रमा पुन्हा शाळेत जाऊ लागली.

**प्रश्न १८)** 'तीर' या शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ असलेली दोन वाक्ये असल्यास दोन गुण द्यावेत. (गुण २)



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

# संच : क

**प्रश्न १९. खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे एक गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट** : स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान** : प्रमाण भाषेचा वापर अपेक्षित नाही.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | केवळ शब्द लिहिणे किंवा काहीही न लिहिणे. |
| १ | यांत्रिकरीत्या एकच वाक्य शब्द बदलून लिहिणे किंवा सुसंगत नसणारे विस्कळीत लेखन. |
| २ | त्रोटक किंवा अर्ध्यामुर्ध्या शब्दातील लेखन. वाक्यरचना काही ठिकाणी तरी नीट आहे. |
| ३ | संपूर्ण प्रसंगाचा एकत्र विचार करून सलगपणे केलेले लेखन. |
| ४ | प्रसंगाच्या तपशिलात भर घालून प्रसंगातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. |
| ५ | प्रसंगाच्या तपशिलात भर घालून प्रसंगातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. पात्रांच्या तोंडी संवाद/बोलणे घातले आहे. |

**प्रश्न २०. खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट** : स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान** :

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | शब्दांची नुसती सुटी सुटी वाक्ये लिहिलेली आहेत. वाक्यात सलगता नाही. |
| २ | दिलेल्या शब्दांवरून संदर्भ घेऊन सलग लेखन, काही वेळा वाक्यरचना विस्कळित असू शकेल, गोष्ट नाही, त्रोटक लेखन. |
| ३ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| ४ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. |
| ५ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका/संवाद दिलेले आहेत. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

**संच : क**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना** : मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी काही प्रश्न विचारणार आहे. त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

**फुलपाखरे ही लहानांपासून ते आबालवृद्ध सर्वांनाच आवडतात. भारतात फुलपाखरांच्या सुमारे १५०० प्रजाती आहेत. प्रत्येक फुलपाखरू हे त्याच्या ठरलेल्या वनस्पतींच्या फुलांकडूनच रंगद्रव्य घेतात. फुलपाखरांच्या पंखावर खूप आकर्षक रंग असतात. परंतु मिटलेल्या पंखांची रंगछटा फिकट असल्याने अशी फुलपाखरे झाडावर बसली की ती आपल्याला ओळखू येत नाहीत. अशाप्रकारे फुलपाखरे आपले संरक्षण करतात. फुलपाखरे या फुलावरून त्या फुलावर जाताना त्यांच्या पायाला चिकटलेले एका फुलातील परागकण दुसऱ्या फुलात जाऊन त्या फुलाचे फळांत रूपांतर होते. ही एक गमतीशीर गोष्ट आहे बरं का!**



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

# संच : क

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही, वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न २) भारतात फुलपाखरांच्या किती जाती आहेत?** | (१) | (अ) |

अ) १५००

ब) ५००

क) १०००

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न ३) फुलपाखरे आपले संरक्षण कशाप्रकारे करतात?** | (२) | (ब) |

अ) उडून जातात.

ब) झाडांवर पंख मिटून बसतात.

क) झाडांच्या पानांत लपतात.

**तोंडी प्रश्न ४) फुलांपासून फळे तयार होण्यासाठी फुलपाखरे कशी मदत करतात? हे तुझ्या शब्दात सांग.** (२)

■■■



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 5/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*